ePaper
गृहमंत्र्यांनी राजीनामा द्यावा!; ‘मराठा क्रांती मोर्चा’ची मागणी

| वर्ष - 7 । अंक - 122 || UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com । सोमवार, दिनांक 4 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## आतील पानांत


- भारताने जिंकला हॉकी आशिया कप!
- स्वप्नील - शिवानी पुन्हा एकत्र
- भारत जोडो यात्रेचा वर्धापन दिन!
- पोलिस बळाचा वापर का झाला ?


# पदपथ, रस्ते घेणार मोकळा श्वास!

## » आयुक्त शेखर सिंहः 5 सप्टेंबरपासून शहरातील अतिक्रमणे हटविण्याची कारवाई होणार

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील रहदारी विचारात घेऊन रस्ते विकसित करणे हे महापालिकेचे उद्दिष्ट्य आहे. पादचारी मार्ग, सायकल मार्ग, सार्वजनिक वाहतुकीसाठी सुसज्ज रस्ते, अशी सुविधा नागरिकांना उपलब्ध होतील असा प्रयत्न आहे. त्यामुळेच काही भागात स्मार्ट सिटी तर, काही भागात अर्बन स्ट्रीट स्केप डिझाईननुसार रस्ते, पदपथ, सायकल मार्ग उभारले आहेत. त्यांसह शहरातील सर्वच पदपथांवरील अतिक्रमणे पाच सप्टेंबरपासून हटविण्याची कारवाई हाती घेतली जाणार आहे, अशी माहिती प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.**



### प्रशासक शेखर सिंह म्हणाले...

- » शहरातील जुन्या वाहतुकीच्या दळण-वळणामध्ये काही बदल करावे लागणार
- » रहदारी कमी करण्यासाठी उपाययोजना राबवताना नागरिकांचा प्रतिसाद गरजेचा
- » हरित सेतू प्रकल्पाला ब्लूमबर्ग इनिशिएटिव्ह फॉर सायकलिंग इन्फ्रास्ट्रक्चर पुरस्कार
- » अतिक्रमणे हटविल्यानंतर नागरिकांना पदपथांचा वापर करणे अधिक सोईस्कर होईल

अर्बन स्ट्रीट स्केप डिझाईननुसार महापालिका विविध रस्त्यांची उभारणी करीत आहे. त्यासंदर्भात चिंचवड येथील ऑटो क्लस्टर सभागृहात आयोजित कार्यशाळेत सिंह बोलत होते. त्यांच्यासह अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी रस्ते निर्मितीचा उद्देश स्पष्ट केला.

कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड, वास्तुविशारद प्रसन्न देसाई, प्रांजली देशपांडे, प्रताप भोसले, विकास ठाकर यांनी प्रकल्पाचे सादरीकरण केले. सिंह म्हणाले, “अर्बन स्केपिंग डिझाईननुसार महापालिका नागरिक व मुलांसाठी शहरात ठिकठिकाणी सायकल ट्रॅक उभारत आहे. त्याला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. भारतीय रस्त्यांची सध्याची परिस्थिती बघता प्रोजेक्ट दिशा प्रस्तावित करण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे रहदारी कमी होण्यास मदत होणार आहे.”

खोराटे म्हणाले, “रस्त्यांची रचना, रुंदी, पादचारी व सायकल मार्ग या गोष्टींचा विचार करून रस्त्यांची निर्मिती केली जात आहे. सायकल मार्ग किंवा पदपथांचा वापर होत नसेल, त्यांवर अतिक्रमण होत असतील, तर नागरिकांमध्ये जागृती करणे गरजेचे आहे. नागरिकांनी जवळच्या ठिकाणी जाण्यासाठी वाहनांऐवजी पादचारी मार्ग किंवा सायकल मार्गाचा वापर करावा.” सहशहर अभियंता प्रमोद ओंभासे यांनी प्रस्ताविक केले. जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी सूत्रसंचालन केले. देसाई यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे अर्बन स्ट्रीट स्केप प्रकल्पाची माहिती दिली. विविध शहरातील रस्त्यांची अवस्था, झाडांचे महत्त्व, पार्किंगचे विविध प्रकार आणि व्यवस्था, सुशोभीकरण आणि सुरक्षितता, रस्त्यांवरील विविध महत्त्वाचे घटक याबाबत माहिती दिली.

# गद्दारांना पेटवण्यासाठी शिवसेनेची मशाल सज्ज!

## » ॲड. सचिन भोसलेः राज्य सरकारच्या विरोधात शिवसेनेचे पिंपरीत आंदोलन

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**आपल्या आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा समाज प्रतिनिधी जालन्यामध्ये शांततेने उपोषण करीत असताना राज्य सरकार मधील ‘अनाजी पंतांच्या आदेशाने’ पोलिसांनी अमानुषपणे त्यांच्यावर लाठीचार्ज करीत हवेत गोळीबार केला. या घटनेचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पिंपरी चिंचवड शहर जिल्ह्याच्या वतीने आम्ही तीव्र निषेध करीत आहे. तसेच या घटनेबाबत राज्य सरकारने महाराष्ट्राची जाहीर माफी मागावी अन्यथा राज्य सरकारमधील ‘अनाजी पंतांना’ आणि गद्दारांना पेटविण्यासाठी शिवसेनेची मशाल सज्ज असल्याचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पिंपरी चिंचवड शहर प्रमुख ॲड सचिन भोसले यांनी सांगितले.**



जालना जिल्हा येथील अंबड तालुक्यातील आंतरवाली सराटी येथे मराठा समाजाच्या आरक्षणासाठी उपोषण करणाऱ्या नागरिकांवर पोलिसांनी अमानुषपणे लाठीमार करीत हवेत गोळीबार केला आहे. त्याचा निषेध करण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पिंपरी चिंचवड शहर प्रमुख ॲड. सचिन भोसले यांच्या नेतृत्वाखाली रविवारी (दि.३ सप्टेंबर ) सकाळी पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक येथे आंदोलन करण्यात आले.

### यांची प्रामुख्याने उपस्थिती...

» यावेळी माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार, जिल्हा संघटिका सुलभा उबाळे, शहर संघटिका अनिता तूतारे, जिल्हा युवती सेनेच्या प्रतिक्ष घुले, माजी नगरसेवक संजय दुर्गुळे, विधानसभा प्रमुख अनंत कोऱ्हाळे, धनंजय आल्हाट, तुषार नवले, माजी शहर प्रमुख योगेश बाबर तसेच युवराज कोकाटे, शैलेश मोरे, रोमी संधू, राजू सोलापुरे, पांडुरंग पाटील, अमोल निकम, मोहन बारटक्के, शिवा कुऱ्हाळकर, विलास चिंचवडे, सागर कांबळे, शंकरराव देसले, आकाश आयवळे, विशाल साळवी, गोरख नवघणे, राम उत्तेकर, गंगाधर काळे, सर्जेराव कचरे, कल्पना शेठ, वैशाली कुलथे, रूपाली अल्हाट, साधना काशीद, रजनी वाघ, नंदा दातकर, उषा आल्हाट, कामिनी मिश्रा, पूनम री, अमृता सुपेकर, संगीता सोनवणे, ज्योती वायकर, प्रतीक्षा दमयंती गायकवाड, संगीता तुटके आदी उपस्थित होते.

# कारागृहाच्या सुरक्षेवर पुन्हा प्रश्नचिन्ह!

## » येरवडा कारागृहात कैद्यांकडे सापडला मोबाईल

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे शहरातील येरवडा मध्यवर्ती कारागृहाची सुरक्षा तोडून तीन मोबाइल कारागृह परिसरात सापडल्याची घटना उघडकीस आली आहे. कारागृहात मोबाइल सापडल्याने कारागृहाच्या कडक सुरक्षा व्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याप्रकरणी निरंजन उर्फ निलेश बाळू शिंदे, महेश राजू पांचारिया यांच्यासह आणखी एका आरोपी विरुद्ध येरवडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




याबाबत कारागृह अधिकारी सुदर्शन खिलारे यांनी येरवडा पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.येरवडा कारागृह रक्षकांनी कैदी निलेश शिंदे याची झडती घेतली. त्यावेळी त्याच्याकडे असलेल्या एका पिशवीत मोबाइल , बॅटरी आणि सीमकार्ड मिळून आले.

राज्यातील सर्वात मोठे आणि बंदी संख्या अधिक असलेले कारागृह अशी ओळख येरवडा कारागृहची असून कारागृह आवारामध्ये यापूर्वी देखील मोठ्या प्रमाणात मोबाइल सापडलेले होते. त्यानंतर कारागृहातील सुरक्षा व्यवस्था प्रशासनाकडून कडक करण्यात आली. कारागृहातील संशयित रक्षकांची चौकशी करण्यात आली होती. कारागृहातील सुरक्षाव्यवस्था तोडून मोबाइल सापडण्याच्या घटना सातत्याने घडत असल्याने कारागृहातील सुरक्षाव्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे अशी चर्चा रंगली आहे.

### सुरक्षाव्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह ?

» राज्यातील सर्वात मोठे आणि बंदी संख्या अधिक असलेले कारागृह अशी ओळख येरवडा कारागृहची असून कारागृह आवारामध्ये यापूर्वी देखील मोठ्या प्रमाणात मोबाइल सापडलेले होते. त्यानंतर कारागृहातील सुरक्षा व्यवस्था प्रशासनाकडून कडक करण्यात आली. कारागृहातील संशयित रक्षकांची चौकशी करण्यात आली होती. कारागृहातील सुरक्षाव्यवस्था तोडून मोबाइल सापडण्याच्या घटना सातत्याने घडत असल्याने कारागृहातील सुरक्षाव्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे अशी चर्चा रंगली आहे.

भरधाव बुलेट मोटारसायकलची धडक बसवून दुचाकीवरील एक ज्येष्ठ नागरिक मृत्युमुखी पडला असल्याची घटना हडपसर येथे घडली. हा अपघात हडपसरजवळील लक्ष्मी कॉलनी परिसरात झाला.या घटनेत धोंडीराम अप्पा चिंधे ( वय- 63, रा. हडपसर,पुणे ) यांचा मृत्यू झाला. चिंधे मोटारसायकलवरून लक्ष्मी कॉलनीच्या दिशेला चालले होते. त्यावेळी भरधाव वेगाने आलेल्या बुलेट मोटारसायकलस्वाराची त्यांना जोरदार धडक बसली. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने त्यांना रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय उपचारांपूर्वी ते मयत झाले. अज्ञात बुलेटस्वार पसार झाला असून त्याच्याविरुद्ध हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सकल मराठा-शिराळा, आम आदमी पार्टी आणि शेतकरी संघटनेच्यावतीने रास्ता रोको

## » आंदोलनास स्थानिकांकडून मिळाले योग्य सहकार्य

। सांगली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे शांततामय मार्गाने आरक्षणाची मागणी करणाऱ्या मराठा समाजावर पोलिसांनी अमानुषपणे लाठीचार्ज केल्याच्या निषेधार्थ रविवार, दि. 3 सप्टेंबर रोजी सकाळी 10 वाजता सागांव (ता. शिराळा, जि. सांगली) येथे सकल मराठा समाज-शिराळा तालुका सह आम आदमी पार्टी आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने छत्रपती शिवाजी उद्यान चौक येथे रास्ता रोको करण्यात आले.**



यावेळी मोठ्या प्रमाणात मराठा समाज रस्त्यावर उतरला होता. काही प्रमाणात वाहतूक ठप्प झाली होती. परंतु पोलिस प्रशासनाने तसेच स्थानिकांनी योग्य सहकार्य केले. रास्ता रोको आंदोलन शांततेत पार पडले. यावेळी मराठा समाज आणि आपचे राम पाटील, मराठा समाजचे समन्वयक दिग्विजय पाटील, शिव-शंभो प्रतिष्ठान शिराळचे कैलास देसाई, मानसिंग पाटील यांनी आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी मोठ्या प्रमाणात घोषणा देत सरकारचा निषेध गृहमंत्री फडणवीस यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी देखील करण्यात आली.

### आंदोलनामध्ये यांची प्रामुख्याने उपस्थिती...

» यावेळी सागाव गावच्या सरपंच अस्मिता पाटील तसेच सागावमधील तमाम मराठा बांधव उपस्थित होते. यामध्ये शिवाजी पाटील, दिलीप भोळे, राजेंद्र लुगडे, चंद्रकांत पाटील, संजय शेटे, शिवलिंग शेटे, अशोक साळुंखे, जितेंद्र देशमुख, विष्णु पवार, तानवडे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# पीएमपीएल बस वाहकाला टेम्पो चालकाकडून मारहाण!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पीएमपीएल बस वाहकाला टेम्पो चालकाने बेदम मारहाण केल्याची घटना वारजे परिसरातील चांदणी चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर घडली.याप्रकरणी समाधान देवकर (वय १९ रा. अंबरनाथ, ठाणे ) याने वारजे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार टेम्पो चालकाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी समाधान हा पीएमपीएल बस वाहक असून १ सप्टेंबरला वारजे परिसरात जाणाऱ्या बसमध्ये कार्यरत होता. त्यावेळी टेम्पो चालकाने बसला ओव्हरटेक केल्याने समाधानने बाहेर पाहिले. त्यामुळे रागाने पाहिल्याचा गैरसमज निर्माण झाल्याने टेम्पो चालकाने समाधानच्या डोक्यात लोखंडी स्टीलने मारहाण करून जखमी केले. याप्रकरणी सहायक पोलीस निरीक्षक एस ओलेकर पुढील तपास करीत आहेत.

ऑनलाईनरित्या मोटार बुक करीत असलेल्या तरूणाच्या हातातील २५ हजारांचा मोबाइल दुचाकीस्वार चोरट्यांनी हिसकावून नेला. ही घटना २ सप्टेंबरला मध्यरात्री दोनच्या सुमारास पुणे स्टेशन परिसरात घडली आहे. याप्रकरणी सुधांशू दळवी (वय २३ रा. परेल, मुंबई )याने बंडगार्डन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे अशी माहिती पोलिसांनी रविवारी दिली.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुधांशू मूळचा मुंबईतील असून कामानिमित्त २ सप्टेंबरमला मध्यरात्रीच्या सुमारास पुणे रेल्वे स्टेशनवर उतरला होता. त्यानंतर रस्त्याने काही अंतर चालत आल्यानंतर अलंकार चौकाजवळ तो ऑनलाईनरित्या मोबाइलवर प्रवासासाठी मोटार बुक करीत होता. त्यावेळी दुचाकीवर आलेल्या दोघा चोरट्यांनी त्याच्याकडील २५ हजारांचा मोबाइल हिसकावून नेला. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक विनय जाधव तपास करीत आहेत.

# मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन साजरा करण्यात यावा!

## मराठवाडा जनविकास संघाच्यावतीने आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे मागणी

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित येत्या १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने साजरा करण्यात यावा, अशी मागणी मराठवाडा जनविकास संघाच्यावतीने महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**



यावेळी मराठवाडा जनविकास संघाचे अध्यक्ष अरुण पवार, मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृत महोत्सव वर्ष समितीचे राज्य शासन सदस्य नितीन चिलवंत, मनसेचे शहराध्यक्ष सचिन चिखले, प्रकाश इंगोले, गया फांऊडेशनचे अध्यक्ष डी. एस. राठोड, मराठवाडा उद्योग संघटनेचे पदाधिकारी शंकर तांबे, मराठवाडा जनविकास सोशल मिडीया प्रमुख अमोल लोंढे आदी उपस्थित होते.

दरम्यान, राज्य शासनाच्यावतीने महाराष्ट्र विधानभवन व मंत्रालयात दरवर्षी साजरा करण्यात यावा, याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनाही निवेदन देण्यात आले.

अरुण पवार यांनी सांगितले, की पिंपरी-चिंचवड शहरात तीन ते साडेतीन लाख मराठवाडा बांधव नोकरी, व्यवसायानिमित्त वास्तव्यास आहेत. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन महापालिका व राज्य शासनाच्यावतीने साजरा करण्यात यावा. याचा शासकीय स्तरावर सकारात्मक विचार होईल, ही अपेक्षा आहे.

अरुण पवार पुढे म्हणाले, की भारत स्वतंत्र झाला, तेव्हा भारतात सहाशे ते सव्वासहाशे संस्थानिक होते. त्यानंतर जवळजवळ सर्वच संस्थानिक स्वतंत्र भारतात विलीन झाले. पण निजामाचा स्वतंत्र भारतात विलीन होण्याला नकार होता. मराठवाडा हा 16 जिल्ह्यांचा मोठा प्रदेश होता.

जर मराठवाडा स्वतंत्र भारतात विलीन झालाच नसता, तर मध्य भारताच्या पोटात पुन्हा एक स्वतंत्र राष्ट्र निर्माण झाले असते. हा एक भारतासाठी मोठा धोका होता. म्हणून मराठवाड्यातील लोकांनी लढे उभारले, संघर्ष केला, बलिदान दिले. हा इतिहास लोकांना माहीत झाला पाहिजे.

### मराठवाडा स्वतंत्र झाला पाहिजे

» नितीन चिलवंत म्हणाले, स्वामी रामानंद तीर्थ, अनंत भालेराव, गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे अशा अनेकांनी मराठवाडा स्वतंत्र झाला पाहिजे. निजामाच्या तावडीतून हा प्रदेश मुक्त झाला पाहिजे, यासाठी लढा उभारला. त्यांच्यामुळेच मराठवाडा स्वतंत्र भारतात विलीन होऊ शकला.

# इंडो ॲथलेटिक्स सोसायटी तर्फे पुणे ते शिवनेरी सायकल राईड

## आग्र्याहून सुटका' या घटनेच्या 356 व्या वर्षानिमित्त राईड, 575 सायकलस्वारांचा सहभाग

।पिंपरी। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**छत्रपती शिवाजी महाराजांची आग्रा येथून सुटका या ऐतिहासिक घटनेच्या निमित्ताने दरवर्षी इंडो ॲथलेटिक्स सोसायटीतर्फे पुणे – शिवनेरी – पुणे अशा २०० किमी सायकल राईडचे आयोजन करते. यावर्षी ५७५ सायकल स्वरांनी यामध्ये सहभाग घेतला. सदर वर्ष पुणे ते शिवनेरी या राईडचे चौथे वर्ष आहे. पर्यावरण आणि आरोग्य याचा संदेश समाजामध्ये देत सदर सायकल स्वारी मार्गक्रमन करते. एका दिवसामध्ये तब्बल १०० किलोमीटर अंतर पाच ते सहा तासांमध्ये पार केले.**



शनिवार २ सप्टेंबर रोजी मोशी येथील गोडाउन चौक येथून सकाळी सहा वाजता सदर सायकल राईडला झेंडा दाखवून सुरुवात झाली. यावेळी आयएएसचे अजित पाटील, गणेश भुजबळ उपस्थित होते.

आग्र्याहून सुटका या ऐतिहासिक प्रसंगाला इतिहासात अतिशय महत्त्व आहे. छत्रपती शिवाजी महाराज आग्रा येथून १७ ऑगस्ट १६६६ साली सुटले होते. या घटनेला यावर्षी ३५६ वर्ष पूर्ण झाली. ते आग्रा येथून निघून मथुरा, प्रयागराज, वाराणसी, गया, कटक, हैदराबाद, मलखेड, विजयपूर, गोकर्ण, पन्हाळा आणि राजगड किल्ला असे तेराशे किलोमीटर अंतर तेरा दिवसांमध्ये पार करुन राजगडावर ३० ऑगस्ट रोजी पोचले होते.

### पुणे ते शिवनेरी सायकल मार्ग

नाशिक फाटा – राजगुरुनगर – मंचर – नारायणगाव – शिवनेरी. असा होता.अष्टविनायका मधील लेण्याद्री करून सर्व सायकलिस्ट ओझर येथे मुक्कामसाठी गेले आणि दुसऱ्या दिवशी याच मार्गावरून परतीचा प्रवास संपन्न झाला. असे आयएएस शिवनेरी सायकल राईडचे प्रमुख मदन शिंदे, दादासाहेब नखाते, प्रशांत तायडे आणि अविनाश चौगुले यांच्या तर्फे सांगण्यात आले.

### नियोजनामध्ये यांचा सहभाग

» नियोजनामध्ये गिरीराज उमरीकर, अमित पवार, रमेश माने, सुशील मोरे, श्रीकांत चौधरी, मारुती विधाते, प्रतीक पवार, सुशील मोरे, श्रेयस पाटील, अजित गोरे, बाळासाहेब तांबे, काळूराम नढे, अमित पवार, अविनाश अनुशे, प्रणय कदू ,श्रीकांत चौधरी, प्रदीप टाके, प्रतीक पवार, कैलास तापकीर, प्रकाश कांबळे आदींनी महत्त्वाची भूमिका बजावली. राजगुरुनगर येथे हुतात्मा राजगुरु सायकल क्लब, नारायणगाव येथे साई संस्थान व शिवनेरी ॲथलेटिक्स असोसिएशन तर्फे स्वागत करण्यात आले. श्रीराज हॉटेल तर्फे सर्वांना मसाला दूध देण्यात आले.




# अम्हास आम्ही पुन्हा पहावे..

**रविवार, ३ सप्टेंबर २०२३ रोजी तुम्ही हा स्तंभ वाचाल तेव्हा, आगामी जी- ट्वेंटी बैठकीभोवतीचा प्रचार आणि प्रचार शिगेला पोहोचला असेल. भारताने यावर्षी जी- ट्वेंटी शिखर परिषदेचे आयोजन केले आहे, याचा मला आनंदच आहे. पण कार्यक्रम आणि त्याचे परिणाम याबद्दल अधिक विनयशील असणे शहाणपणाचे आहे, असे मला वाटते.**

मी असे का म्हणतो? कारण जी- ट्वेंटी बैठका नित्याच्या आहेत आणि १९९९ पासून त्या दरवर्षी आयोजित केल्या जात आहेत. २००८ मध्ये (आंतरराष्ट्रीय आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर) सरकारच्या प्रमुखांची पहिली शिखर परिषद वॉशिंग्टन येथे आयोजित करण्यात आली होती. दोन जी- ट्वेंटी बैठकांदरम्यान, संबंधित नेत्यांना वेगवेगळ्या बॅनरखाली भेटण्याच्या अनेक संधी उपलब्ध असतात. उदाहरणार्थ संयुक्त राष्ट्रे, जी सेव्हन, डब्ल्यूईएफ, आयपीसीसी, एससीओ, ब्रिक्स, क्वाड, एयूकेयूएस, एसियान, यूएनसीटीडी आणि इतर. यासंदर्भात गमतीने असे म्हटले जाते की तुम्ही इंग्रजी भाषेतील चार किंवा पाच आद्याक्षरे घेतलीत, तर ते बहुधा एखाद्या नवीन आंतरराष्ट्रीय बहुपक्षीय संस्थेचे नाव असते. जी – ट्वेंटीचे अध्यक्षपद आळीपाळीने मिळते. २००३ मध्ये भारत अध्यक्ष होता. आता २०२३ मध्येही आहे.




२०४३ मध्ये भारत पुन्हा अध्यक्ष होईल. भारताने आपल्या या अध्यक्षपदाबाबत फार गाजवाजा न करता विनयशील असायला हवे. त्यासाठी काही कारणेही आहेत. एक म्हणजे जी- ट्वेंटी सदस्य-देशांपैकी, भारताचे दरडोई उत्पन्न सर्वात कमी (२,०८५ अमेरिकी डॉलर्स), भारतात गरिबांची संख्या सर्वात जास्त (२३० दशलक्ष) आणि जागतिक भूक निर्देशांकात भारताचा क्रमांक १०७ (१२३ पैकी) वा आहे. याचा अर्थ १९९१ पासून झालेल्या भारताच्या विकासाला कमी लेखायचे आहे, असा होत नाही. फक्त काही देशांनीच दर दहा वर्षांनी स्थिर किमतीतील त्यांचा विकासदर दुप्पट केला आहे: २०१४-१५ मध्ये चांगली सुरुवात असूनही, २०२३-२४ पर्यंत विकासदर दुप्पट होणार नाही आणि ही संधी वाया जाईल. याचे कारण म्हणजे एनडीएच्या नऊ वर्षांच्या कालावधीत सरासरी वाढीचा दर यूपीएच्या दहा वर्षांच्या ७.५ टक्क्यांच्या तुलनेत केवळ ५.७ टक्के राहिला आहे. २००४ पासून आपण ४१५ दशलक्ष लोकांना गरिबीतून बाहेर काढले आहे; तरीही २३० दशलक्ष लोक गरीब आहेत. गरिबीचे प्रमाण कमी असूनही आपल्याकडे वैयक्तिक उपभोग शहरी भागात १,२८६ रुपये प्रति महिना आणि ग्रामीण भागात १,०८९ रुपये दरमहा असा आहे. आपल्याकडे थेट चंद्रावर यान उतरवण्याचे वैज्ञानिक कौशल्य आहे, पण आठवीच्या वर्गातल्या एकूण मुलांपैकी ३० टक्के मुलांना दुसरीच्या इयत्तेचा मजकूर वाचता येत नाही आणि ५५ टक्के मुलांना साधा गुणाकार आणि भागाकार करता येत नाही. आपल्या विकासाच्या गोड फळांना असा कडवटपणा आहे. फक्त निवासी भारतीयांनाच आपल्या चुका आणि आपले अपयश दिसते, असे आपल्याला वाटत असेल तर आपण मूर्खांच्या नंदनवनात जगत आहोत. आपल्याला जशा जगातील इतर अनिष्ट गोष्टी, उदाहरणार्थ वेगवेगळ्या देशांतील हुकूमशाही, लुटुपुटुच्या निवडणुका, मोठ्या प्रमाणात असलेला वर्णद्वेष, महिलांवर होणारी दडपशाही, राजकीय आणि मानवी हक्क नाकारले जाणे आणि कॉर्पोरेट मक्तेदारी या गोष्टी दिसतात आणि आपण त्यावर मुक्तपणे टिप्पणी करतो, तसेच जगालाही आपले अपयश दिसते. जग त्याची दखल घेते. वर्तमान संदर्भात, जी- ट्वेंटी देश जगाच्या अर्थव्यवस्थेबद्दल खूप चिंतित आहेत. भरती ही अशी लाट असते की जी जवळजवळ सगळ्या बोटींना उचलते, या गोष्टीशी सर्व अर्थशास्त्रज्ञ सहमत आहेत. आर्थिक सुबत्तेने लोकांचे वर्तन, सार्वजनिक आचरण आणि रोजच्या बोलण्याची भाषा कशी 'सुसंस्कृत' होते, ते मी पाहिले आहे. (चेन्नईत ६० आणि ७० च्या दशकात जितके 'मद्रास तमिळ' कानावर पडत असे, तितके कानावर येत नाही.) काही देश श्रीमंत का आहेत आणि ते श्रीमंत कसे झाले? माझ्या मते, त्यांनी चार गोष्टी केल्या: पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक केली, शिक्षणावर आणि आरोग्यावर खर्च केला आणि इतर देशांशी मुक्त व्यापार केला. भारत या गोष्टी काही प्रमाणात योग्य पद्धतीने करत आहे. आपण पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करत आहोत, पण ती पुरेशी नाही. आपला शिक्षणावरील खर्च (जीडीपीच्या तीन टक्के) आणि आरोग्यावर (जीडीपीच्या १.४ टक्के) कमी आहे.

## संपादकीय »

# भारताचा पुढाकार

***भारताने 'जी-२०'च्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात शिखर परिषदेत 'गांधीनगर इम्प्लिमेंटेशन रोडमॅप' (जीआयआर) आणि 'गांधीनगर इन्फॉर्मेशन प्लॅटफॉर्म' (जीआयपी) चे उद्घाटन केले.***

गेल्या काही दशकांमध्ये वणव्यांची तीव्रता आणि व्याप्ती वाढली आहे. कॅनडातील बोरीअल वने आणि ब्राझीलमध्ये अमेझॉनच्या खोऱ्यातील वर्षावनांसारख्या कार्बन धरून ठेवणाऱ्या महत्त्वपूर्ण जंगलांची वणव्यांमुळे पुष्कळ हानी होत आहे. वर्ष २००१ च्या तुलनेत आता दरवर्षी वणव्यामध्ये ३० लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावरील वृक्षाच्छादन नष्ट होत असल्याचे 'मेरीलँड विद्यापीठा'ने केलेल्या एका अभ्यासात दिसून आले आहे.

वणव्यांच्या वारंवारतेत, तीव्रतेत आणि भौगोलिक व्याप्तीत होत असलेली वाढ ही परिसंस्था आणि मानवी व्यवहारांसाठी धोक्याची घंटा आहे. हवामान बदलामुळे तीव्र उष्णतेच्या लाटा १५० वर्षांपूर्वीच्या तुलनेत पाच पटीने वाढल्या आहेत व वणव्यांमध्येही वाढ झाली आहे.

**आर्थिक वर्षांच्या एप्रिल ते जून या प्रथम तिमाहीत भारताच्या अर्थव्यवस्थेने ७.८ टक्के असा धडधाकट विकासदर नोंदवल्याचे राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने गुरुवारी सायंकाळी जाहीर केले. रिझर्व्ह बँकेने ऑगस्टमध्ये व्यक्त केलेल्या आठ टक्क्यांच्या अंदाजाच्या तुलनेत हा दर किंचित थिटा पडला असला तरी त्याने जगातील सर्वात वेगवान अर्थव्यवस्था म्हणून भारताचे बिरूद मात्र कायम राखले आहे.**

# कसं पिकावं विकासाचं रान ?

शिवाय मागील चार तिमाहीत नोंदविला गेलेला हा सर्वोच्च दर आहे. पण हे समाधान खरे तर औटघटकेचे ठरावे. ते का हे या आकडेवारीसंबंधाने देशाचे आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी केलेल्या टिप्पणीतूनच पुरते स्पष्ट होते. एकंदरीत ही आकडेवारी आश्वासक न भासता, आर्थिक विश्लेषकांमध्ये आगामी काळाबाबत चिंतेची लकेर निर्माण करणारी आहे, ते कशामुळे हे पाहूया. खोलात गेल्यावर लक्षात येईल की, मागील काही वर्षांत जून तिमाहीसाठी सकल राष्ट्रीय उत्पादन अर्थात जीडीपीची आकडेवारी ही कायम भरभक्कम राहत आली आहे. जून २०२० मध्ये करोना महासाथीनंतरच्या देशव्यापी टाळेबंदीने शून्याखाली (उणे) २३.४ टक्क्यांपर्यंत झालेली जीडीपी दराची अधोगती ही याच्या मुळाशी असल्याचे सुस्पष्टच आहे. वार्षिक आधारावर तुलना करायची झाल्यास, गेल्या वर्षी म्हणजे जून २०२२ तिमाहीतील




जीडीपी वाढीचा दर १३.१ टक्के होता, तर त्या आधी जून २०२१ मध्ये तर तो २०.१ टक्के असा भरमसाट होता. म्हणजेच जून तिमाहीतील वाढीचा हा अचानक वाढलेला वेग किंवा उच्च विकासदर हा २०२० मधील करोना टाळेबंदीतील तीव्र मंदीतून अर्थव्यवस्था सावरल्याचे प्रतीकच आणि त्याबद्दल तक्रार नाहीच. पण करोना संकटाच्या आधीपासून म्हणजे जून २०१९ ते जून २०२३ पर्यंत चक्रवाढ वार्षिक जीडीपी वाढीचा दर पाहिला गेल्यास तो अवघा ३.२ टक्के इतकाच भरेल. वाढ अथवा विकासाची प्रक्रिया ही निरंतर असते आणि त्यामुळे या वाढीला जोखताना, सुटय़ा सुटय़ा आकडय़ांना नव्हे तर त्यांच्या संयोजित, आपसांत जुळलेल्या रूपातच जोखले गेले पाहिजे. जून तिमाहीच्या आकडेवारीत अपेक्षेप्रमाणे सेवा क्षेत्राने मजबूत वाढ दर्शविली आहे. वित्तीय सेवा, स्थावर मालमत्ता आणि व्यावसायिक सेवांचे एकूण वाढीत १२.२ टक्क्यांच्या वाढीचे योगदान आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाची तऱ्हा गेल्या काही वर्षांत किती असंतुलित बनली आहे त्याचाच हा प्रत्यय आहे. देशाच्या वास्तविक सकल मूल्यवर्धनात, वित्तीय सेवा, स्थावर मालमत्ता आणि व्यावसायिक सेवा या मोजक्या काही अंगांचा वाटा तब्बल ३९ टक्क्यांच्या घरात जाणारा आहे. सेवा क्षेत्रच आपल्या अर्थव्यवस्थेची प्रमुख चालकशक्ती बनली आहे हे मान्य. पण मग निर्मिती क्षेत्र (बांधकाम उद्योगासह) आणि कृषी क्षेत्र ही अर्थव्यवस्थेची अन्य दोन महत्त्वाची चाके डबक्यात रुतलेली असणेदेखील परवडणारे नाही. अर्थव्यवस्थेचा गाडा पुढे सरकायचा तर तिन्ही चाकांमध्ये किमान संतुलन आवश्यकच ठरेल.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पोलिस बळाचा वापर का झाला ?

## » कोणीही कायदा हातात घेऊ नये : पोलिस महानिरीक्षक

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जालना जिल्ह्यातील अंतरवली सराटी गावात मराठा आंदोलकांवर झालेल्या अमानुष लाठीहल्लानंतर राज्यभरात या घटनेचे पडसाद पडू लागले आहेत. तर या घटनेनंतर राज्यातील राजकारणं देखील चांगलंच तापलेले दिसून येत आहे. शरद पवार, उद्धव ठाकरे, आमदार रोहित पवार, संभाजीराजे, उदयनराजेंसह विविध पक्षाच्या नेत्यानी या गावाला भेट देऊन आंदोलकांची भेट घेतली. दरम्यान, ही घटना कशी घडली, पोलिसांनी बळाचा वापर का केला.**






याबाबत औरंगाबाद परिक्षेत्राचे पोलिस महानिरीक्षक यांनी खुलासा केला आहे. तर आता परिस्थिती संपूर्णपणे नियंत्रणात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ते टीव्ही9 या वृत्तवाहिणीशी बोलत होते. पोलिस महानिरीक्षक डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण म्हणाले, मंगळवारपासून मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण सुरू केले. त्यांची प्रकृती खालावत होती. तसा डॉक्टरांनी आम्हाला अहवाल दिला. त्यानुसार, त्यांच्या आरोग्याच्या दृष्टिकोणातून त्यांना रुग्णालयात घेऊन जाण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यासाठी ते तयारही झाले होते. पण, काही जनसमुदायाचा विरोध होता. त्यामुळे जनसमुदायाने महिला पोलिस कर्मचाऱ्यांवर दगडफेक केली.

एसआरपीचे जवान जखमी झाले. हिंसक जमावाला पांगवण्यासाठी उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांनी बळाचा वापर करून जमाव पांगवला, असा खुलासा चव्हाण यांनी केला. आरोपींविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले. अंबड या ठिकाणी पोलिसांवर दगडफेक करण्यात आली. 40 आरोपींना अटक केली. एसआरपीच्या तीन कंपन्या मिळाल्या आहेत. बाजूच्या ठाण्यातून फोर्स उपलब्ध करून देण्यात आली आहे. पेट्रोलिंग सुरू करण्यात आली आहे. आता परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आलेली आहे. नागरिकांनी कुठल्याही प्रक्षोभक भाषणाला बळी पडू नये. कायदा आपल्या हाती घेऊ नये. शांततेचं वातावरण राहण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे. महिला पोलिसांवर दगडफेक करण्यात आली. दोन पोलिसांना आयसीयूमध्ये भरती करावे लागले. सात जणांचे सीटीस्कॅन करावे लागले. हे वास्तव असल्याचे पोलिस महानिरीक्षक डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांनी स्पष्ट केले. जमाव आक्रमक झाल्यानंतर आम्ही जमावाला शांततेचं आवाहन केलं होतं.

आंदोलकांनी प्रतिसाद न दिल्यामुळे बळाचा वापर करावा लागला. हिंसक आरोपींना ताब्यात घेतले आहे. २१ महिला पोलीस आणि ४३ पुरुष पोलीस असे 64 पोलिस कर्मचारी जालना सिव्हील रुग्णालयात उपचार घेत आहेत, अशी माहिती पोलीस महानिरीक्षकांनी दिली. जालना जिल्ह्यात झालेल्या घटनेनंतर आता सरकारने कारवाईला सुरुवात केली आहे.

गृहमंत्रालयाकडून जालना जिल्ह्याचे एसपी यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. जालना जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक तुषार दोशी यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, जालना येथील पोलिस अधीक्षक पदाचा पदभार आयपीएस अधिकारी शैलेश बलकवडे यांच्याकडे देण्यात आला आहे

### महिला पोलिसांवर हल्ला केला

» पोलिस महानिरीक्षक डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण म्हणाले, मंगळवारपासून मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण सुरू केले. त्यांची प्रकृती खालावत होती. तसा डॉक्टरांनी आम्हाला अहवाल दिला. त्यानुसार, त्यांच्या आरोग्याच्या दृष्टिकोणातून त्यांना रुग्णालयात घेऊन जाण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यासाठी ते तयारही झाले होते. पण, काही जनसमुदायाचा विरोध होता. त्यामुळे जनसमुदायाने महिला पोलिस कर्मचाऱ्यांवर दगडफेक केली. एसआरपीचे जवान जखमी झाले. हिंसक जमावाला पांगवण्यासाठी उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांनी बळाचा वापर करून जमाव पांगवला, असा खुलासा चव्हाण यांनी केला.

# सरकार अन् आंदोलकांमधील बैठक निष्फळ!

## » जरांगे पाटलांनी उपोषण सोडण्याची विनंती धुडकावली

।मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषणकर्त्यांवर पोलिसांकडून लाठीचार्ज करण्यात आला. त्यानंतर राजकीय आरोप प्रत्यारोप सुरू असून राज्यभरात त्याचे पडसाद पडत आहे. शरद पवार, उध्दव ठाकरे यांच्यासह खा. उदयनराजे, माजी खासदार संभाजीराजे यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेत सरकारवर निशाणा साधला.**

त्यामुळे सरकारची चांगलीच कोंडी झाली. मात्र, याचवेळी सरकारच्या संकटकाळात धावून येणारे मंत्री गिरीश महाजन यांनी रविवारी रात्री उपोषणकर्त्यांची भेट घेतली. त्यांनी तुमच्या मागण्या मान्य केल्या जातील फक्त उपोषण मागे घ्या अशी विनंती केली. मात्र, उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी महाजनांची मागणी धुडकावून लावली.

यावेळी मंत्री गिरीश महाजन, आमदार नितेश राणे, आमदार मंगेश चव्हाण या नेत्यांनी सरकारच्या वतीने मराठा आरक्षणासाठी उपोषण करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांची आंदोलनस्थळी जाऊन भेट घेतली. त्यांच्यासोबत चर्चा करताना उपोषण मागे घेण्याची विनंतीही केली.



पण ही मागणी धुडाकावून लावत जरांगे हे अध्यादेश निघत नाही तोपर्यंत मी उपोषणावर ठाम असल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे सरकार आणि उपोषणकर्त्यांमधील बैठक निष्फळ ठरली आहे. महाजन म्हणाले, आपल्याला जर कायमस्वरुपी न्याय द्यायचा असेल तर दोन दिवसांचा आग्रह न धरता एक महिन्यांचा अवधी द्यावा अशी विनंती गिरीश महाजनांनी केली. एका महिन्यात सरकार निर्णय घेईल असेही ते म्हणाले.

समजा आपण बळजबरीने आरक्षणासंदर्भातला अध्यादेश काढला तरी तो कोर्टात टिकणार नाही असेही ते म्हणाले. महाजन पुढे बोलताना म्हणाले की, मागच्यावेळी काय अवस्था झाली हे आपण पाहिले आहे. आणि सर्वोच्च न्यायालयात ते आरक्षण फेटाळण्यात आले. तिथे ते व्यवस्थित मांडण्यात आले. निकाल आपल्या बाजूने लागेल. पण हे दोन दिवसांत होणार नाही. आपण थोडा वेळ द्या आपला हक्क आपण त्यांच्याकडून नक्की मागून घेऊ असेही महाजन यावेळी म्हणाले.

संपूर्ण मराठा समाजाला कुणबी समजून ओबीसीमध्ये समाविष्ट करुन, किंवा ओबीसी समाजाचा दाखला देऊन मराठा समाजाला आरक्षण द्या, असे मनोज जरांगे पाटील यांचे म्हणणे आहे. पण तसं करणं शक्य नाही.

### त्यासाठी थोडा वेळ आम्हाला द्यावा लागेल

» वेगळ्या पध्दतीने जाऊन, पूर्वी आपला समाज हा कुणबी म्हणून समजला जात होता आता त्याचे पुरावेही आपल्याला शोधावे लागतील. त्यात कलेक्टर आम्हांला बोलले की, बारा गावे असे आहेत की, तिथे कुणबी म्हणून उल्लेख आहे. त्याचे कागदपत्री पुरावी आपल्याला शोधावे लागतील किंवा आणखी दुसरा काही पर्याय मिळतो का ते पाहावे लागेल. म्हणून थोडा वेळ द्यावा लागेल असेही महाजन म्हणाले.

# काश्मीर-अरुणाचलमध्ये G20 बैठक घेणे आमचा अधिकार : पंतप्रधान मोदी

## » आजी-माजी आमदारांसह 10 नेत्यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**काश्मीर आणि अरुणाचल प्रदेशमध्ये जी-20 बैठक घेण्यावर पाकिस्तान आणि चीनचा आक्षेप पंतप्रधान नरेंद्र मोदींनी फेटाळून लावला आहे. ते म्हणाले की, आम्हाला आमच्या देशाच्या कोणत्याही भागात बैठक घेण्याचा अधिकार आहे. गेल्या आठवड्यात पीटीआय या वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी हे वक्तव्य केले होते. या मुलाखतीची माहिती रविवारी समोर आली.**

खरं तर, चीन (G20 सदस्य) आणि पाकिस्तानने काश्मीरच्या काही भागात G20 कार्यक्रम आयोजित करण्यावर आक्षेप घेतला होता. काश्मीर हा वादग्रस्त भाग आहे, त्यामुळे येथे कार्यक्रम होऊ नये, असे दोन्ही देशांनी म्हटले होते. याबाबत पीएम मोदी म्हणाले की, आम्ही काश्मीर आणि अरुणाचलमध्ये बैठक घेण्याचे टाळले असते तर असा प्रश्न योग्य ठरला असता. आपला देश खूप विशाल, सुंदर आणि विविधतेने परिपूर्ण आहे. देशात G20 ची बैठक होत असताना देशाच्या प्रत्येक भागात बैठका होणार हे स्वाभाविक आहे. यापूर्वी 28 ऑगस्ट रोजी चीनने नकाशा जारी करून अरुणाचल आणि अक्साई चीनला आपला हिस्सा घोषित केले होते. पीएम मोदींच्या या वक्तव्याला चीनच्या या कारवाईला प्रत्युत्तर म्हणूनही पाहिले जात आहे. 2047 पर्यंत भारत विकसित देश बनेल, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. मग आपल्या जीवनात भ्रष्टाचार, जातिवाद, जातीयवाद यांना स्थान राहणार नाही. फार पूर्वी जग भारताला 100 कोटी भुकेल्या लोकांचा देश मानत होता, पण आता आपण 100 कोटी महत्त्वाकांक्षी मनांचा आणि 200 कोटी कुशल हातांचा देश झालो आहोत. पुढील हजार वर्षे स्मरणात राहील अशा विकासाचा पाया रचण्याची संधी आज भारतीयांना आहे. एका दशकापेक्षा कमी कालावधीत आघाडीच्या अर्थव्यवस्थांच्या यादीत आम्ही पाच स्थानांनी झेप घेतली आहे. भारत लवकरच जगातील तीन मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये सामील होणार आहे.

'सबका साथ सबका विकास' हे केवळ देशासाठीच नव्हे तर जगासाठी मार्गदर्शक तत्त्व बनू शकते, असे पंतप्रधान म्हणाले. G20 बैठकीतील आमचे शब्द आणि आमची दृष्टी हे जग केवळ कल्पना म्हणून मानत नाही, तर भविष्यासाठी एक रोडमॅप मानते.

पीएम मोदी म्हणाले की, भारताच्या G20 अध्यक्षपदावरून अनेक सकारात्मक बदल होत आहेत, त्यातील काही माझ्या हृदयाच्या खूप जवळ आहेत. जगाचा दृष्टीकोन, जो आतापर्यंत जीडीपीवर केंद्रित होता, तो आता मानवांवर केंद्रित होत आहे. या बदलात भारताने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी सकाळी इस्रोच्या कमांड सेंटरमध्ये चांद्रयान-3 टीमच्या शास्त्रज्ञांची भेट घेतली. येथे त्यांनी 3 घोषणा केल्या. पहिला- भारत दरवर्षी 23 ऑगस्ट रोजी राष्ट्रीय अंतराळ दिन साजरा करेल. दुसरे- चंद्रावर लँडर ज्या ठिकाणी उतरले त्या ठिकाणाला शिव-शक्ती पॉइंट म्हटले जाईल. तिसरा- चंद्रावरील ज्या बिंदूवर चांद्रयान-2 चे ठसे आहेत, त्याला 'तिरंगा' असे नाव दिले जाईल.



### 2047 पर्यंत भारत विकसित देश होईल

» 2047 पर्यंत भारत विकसित देश बनेल, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. मग आपल्या जीवनात भ्रष्टाचार, जातिवाद, जातीयवाद यांना स्थान राहणार नाही. फार पूर्वी जग भारताला 100 कोटी भुकेल्या लोकांचा देश मानत होता, पण आता आपण 100 कोटी महत्त्वाकांक्षी मनांचा आणि 200 कोटी कुशल हातांचा देश झालो आहोत. पुढील हजार वर्षे स्मरणात राहील अशा विकासाचा पाया रचण्याची संधी आज भारतीयांना आहे.

# काँग्रेस भारत जोडो यात्रेचा पहिला वर्धापन दिन!

## » 7 सप्टेंबरला देशातील प्रत्येक जिल्ह्यात यात्रा काढणार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेला एक वर्ष पूर्ण होत आहे. यानिमित्त काँग्रेसने देशातील प्रत्येक जिल्ह्यात भारत जोडो यात्रा काढण्याची घोषणा केली आहे. त्यासाठी अनेक ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे नियोजनही पक्षाने केले आहे.**

राहुल गांधी यांनी गेल्या वर्षी 7 सप्टेंबर रोजी कन्याकुमारी येथून भारत जोडो यात्रा सुरू केली होती. 145 दिवस चाललेला हा 4000 किलोमीटरचा प्रवास 30 जानेवारीला श्रीनगर, जम्मू-काश्मीरमध्ये संपला. ही यात्रा किती दिवसांची असेल याची रूपरेषा आणि अन्य माहिती लवकरच जिल्हा काँग्रेस समित्यांना पाठवण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. श्रीनगरमध्ये यात्रेच्या समारोपाच्या वेळी शेर-ए-काश्मीर क्रिकेट स्टेडियमवर राहुल म्हणाले होते- मी ही यात्रा माझ्यासाठी किंवा काँग्रेससाठी नाही तर देशातील जनतेसाठी केली आहे. या देशाचा पाया उद्ध्वस्त करू पाहणाऱ्या विचारसरणीच्या विरोधात उभे राहणे हे आमचे उद्दिष्ट आहे. यादरम्यान राहुल गांधींनी 12 सार्वजनिक सभांना संबोधित केले आणि 100 हून अधिक सभा आणि 13 पत्रकार परिषदांमध्येही भाग घेतला. चालत असताना त्यांनी 275 हून अधिक चर्चांमध्ये भाग घेतला, तर कुठेतरी थांबताना त्यांनी सुमारे 100 चर्चा केल्या. राहुल गांधी आपल्या प्रवासात देशातील 12 राज्यांतून गेले. ज्यामध्ये कर्नाटक, केरळ, आंध्र प्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, हरियाणा, हिमाचल प्रदेश, दिल्ली, पंजाब आणि जम्मू-काश्मीरचा समावेश आहे. या यात्रेत काँग्रेसचे अनेक बडे नेतेही त्यांच्यासोबत होते. यावेळी देशातील अनेक दिग्गज व्यक्तीही त्यांच्या यात्रेत सामील झाल्या. या यात्रेत कमल हासन, पूजा भट्ट, रिया सेन, सुशांत सिंग, स्वरा भास्कर, रश्मी देसाई, आकांक्षा पुरी आणि अमोल पालेकर यांसारख्या चित्रपट आणि टीव्ही व्यक्तिमत्त्वांसह समाजाच्या विविध स्तरातील व्यक्तींचा सहभाग होता. यादरम्यान राहुल आपल्या समर्थकांचे तसेच विरोधकांचे लक्ष वेधण्यात यशस्वी झाले.

भारत जोडो यात्रेने राहुल गांधी आणि काँग्रेसची प्रतिमा बदलण्यात महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचे जाणकारांचे मत आहे. या यात्रेने राहुल यांना राजकारणात अनिर्णयशील आणि अर्धवेळ नेता न राहता एक परिपक्व आणि गंभीर विरोधी नेता अशी प्रतिमा निर्माण करण्यास मदत केली. राहुल गांधी गुजरात ते मेघालय अशी पदयात्रा काढणार असल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी 8 ऑगस्ट रोजी दिली होती. मात्र, त्यांनी याची तारीख जाहीर केली नाही. या काळात पक्षाच्या महाराष्ट्र विभागाचे नेते आणि कार्यकर्ते राज्यात पदयात्रा काढणार असल्याचे पटोले यांनी सांगितले. काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी बिहारचे प्रसिद्ध चंपारण मटण RJD सुप्रीमो लालू यादव यांच्याकडून बनवायला शिकले. त्यांनी शनिवारी त्यांच्या यूट्यूब चॅनलवर त्याचा व्हिडिओ शेअर केला.



### गुजरात ते मेघालय पदयात्रा काढणार

» भारत जोडो यात्रेने राहुल गांधी आणि काँग्रेसची प्रतिमा बदलण्यात महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचे जाणकारांचे मत आहे. या यात्रेने राहुल यांना राजकारणात अनिर्णयशील आणि अर्धवेळ नेता न राहता एक परिपक्व आणि गंभीर विरोधी नेता अशी प्रतिमा निर्माण करण्यास मदत केली. राहुल गांधी गुजरात ते मेघालय अशी पदयात्रा काढणार असल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी 8 ऑगस्ट रोजी दिली होती. मात्र, त्यांनी याची तारीख जाहीर केली नाही.

# वाळवीनंतर स्वप्नील - शिवानी पुन्हा एकत्र



स्वप्नील जोशी - शिवानी सुर्वे यांचा वाळवी सिनेमा प्रचंड गाजला. वाळवी सिनेमा यावर्षी म्हणजेच २०२३ ला जानेवारी महिन्यात रिलीज झाला. सिनेमाला सुरुवातीला थंड प्रतिसाद होता. पण नंतर केवळ माऊथ पब्लिसिटीच्या जोरावर सिनेमाने प्रचंड यश संपादन केलं. वाळवी मध्ये गाजलेली जोडी म्हणजे अभिनेता स्वप्नील जोशी आणि अभिनेत्री शिवानी सुर्वे. आता वाळवीनंतर स्वप्नील - शिवानी नवीन सिनेमातुन एकत्र येणार आहेत. त्यांच्या जोडीला आहे प्रसाद ओक. आज या सिनेमाची घोषणा करण्यात आलीय. स्वप्नील - शिवानी आगामी जिलबी सिनेमातुन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. जिलबी सिनेमाच्या शुटींगला आजपासुन सुरुवात झालीय. प्रसाद ओक शुटींगचा फोटो शेअर केलाय. नितीन कांबळे यांनी या सिनेमाचं दिग्दर्शन केलंय. सिनेमात स्वप्नील जोशी आणि शिवानी सुर्वे यांची भुमिका नेमकी काय हे अद्याप गुलदस्त्यात आहे. वाळवी सिनेमात स्वप्नील आणि शिवानी या जोडीने धम्माल उडवली होती. दोघांची केमिस्ट्री अनेकांना आवडली. आता जिलबी निमित्ताने स्वप्नील - शिवानीची जोडी पुन्हा कशी धम्माल उडवणार हे पाहायचं आहे. वाळवी सिनेमा इतका जबरदस्त होता की तो पाहून अनेकांचे डोकं सुन्न झालं. वाळवी सिनेमाने जे यश मिळवलं त्यामुळे निर्मात्यांनी वाळवी सिनेमाचे कलाकार आणि तंत्रज्ञांना घेऊन सिनेमाची सक्सेस पार्टी आयोजित केली होती. या सक्सेस पार्टीत सिनेमाचे वाळवी सिनेमाचे निर्माते आणि झी स्टुडिओजचे हेड मंगेश कुलकर्णी यांनी वाळवी च्या पुढच्या भागाची म्हणजेच वाळवी २ ची घोषणा केली. त्यामुळे सिनेमाच्या टीमने पार्टीत एकच जल्लोष केला.

# खरंतर भक्ताला कुठलंही देऊळ सारखंच!

मराठमोळी अभिनेत्री हेमांगी कवी ही नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. ती सोशल मीडियावर प्रचंड सक्रीय असते. सोशल मिडियाच्या माध्यमातुन ती अनेक विषयांवर भाष्य करत असते. रोखठोकपणे आणि बिनधास्तपणे ती सोशल मिडियावर तिचं मत मांडत असते. हेमांगीने आजवर विविध सिनेमा, मालिका आणि नाटकांमधून आजवर अभिनय केलाय. हेमांगी सोशल मिडीयावर विविध पोस्टच्या माध्यमातुन चाहत्यांच्या संपर्कात असते. काही दिवसांपुर्वी तिने सोशल मीडियावर एक पोस्ट शेयर करत चाहत्यांना एक गोड बातमी दिली होती. मुंबईतील चर्नी रोड येथील रॉयल ऑपेरा हाऊस मध्ये हेमांगीच्या जन्मवारी नाटकाचा प्रयोग रंगणार आहे. त्यानिमित्ताने रॉयल ऑपेरा हाऊस मध्ये प्रयोग करण्याचं हेमांगीचं स्वप्न पूर्ण होईल. आता तिच हे स्वप्न पुर्ण झालं आहे. तिने नुकतच सोशल मीडियावर तिचे काही फोटो शेयर केले आहेत. तिने हे फोटो मुंबईतील रॉयल ओपेरा हाऊसच्या बाहेर काढले आहेत. आता पोस्ट शेयर करत त्यात हेमांगी लिहिते की, "खरंतर भक्ताला कुठलंही देऊळ सारखंच! काल मुंबईच्या रॉयल ऑपेरा हाऊस मध्ये आमच्या 'जन्मवारी' नाटकाचा रॉयल प्रयोग झाल्यामुळे माझी ही पण इच्छा पूर्ण झाली!खरंच नावाप्रमाणे सगळा रॉयल कारभार. नाट्यगृहाचं INTERIOR, LIGHTS, DECORUM, GREENROOMS, त्यातलं FURNITURE, स्वच्छता, CORRIDORS, रंगसंगती, SOUND SYSTEM, भव्य दिव्यपणा! आहाहा! क्या बात है. सगळंच विलक्षण! एखाद्या राजमहालात आलोय की काय असंच वाटत होतं! इतक्या वर्षांपासून फक्त इतरांकडून या वास्तूचं कौतुक ऐकत आलेय.



# तमन्नाने शेअर केला मालदीवचा व्हिडिओ

तमन्ना भाटिया नुकतीच मालदीवमध्ये सुट्टीसाठी गेली होती. यादरम्यान, अभिनेत्रीने तिच्या सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये ती बीचवर एन्जॉय करताना दिसत आहे. व्हिडिओमध्ये तमन्ना कधी आईस्क्रीमचा आस्वाद घेत आहे तर कधी झुल्यावर आराम करत आहे. तमन्नाचा हा व्हिडिओ चाहत्यांना खूप आवडतोय. तमन्ना भाटियाने चित्रपटसृष्टीत 18 वर्षे पूर्ण केली आहेत. या खास प्रसंगी, अभिनेत्रीने तिच्या सोशल मीडिया अकाउंटवर एक व्हिडिओ शेअर केला आणि तिच्या संपूर्ण प्रवासाची झलक दाखवली. या व्हिडिओमध्ये तमन्नाने तिच्या बाहुबली, जेलर, बाहुबली 2, लस्ट स्टोरीज-2 या चित्रपटांच्या अनेक क्लिप जोडल्या होत्या. व्हिडिओ शेअर करताना त्याने चाहत्यांच्या पाठिंब्याबद्दल आभारही मानले आहेत. तमन्ना भाटियाची नुकतीच आखरी सच ही वेब सिरीज रिलीज झाली आहे. ही मालिका दिल्लीतील बहुचर्चित बुरारी घटनेवर आधारित आहे. जिथे एकाच कुटुंबातील 11 जणांनी सामूहिक आत्महत्या केली होती. तमन्ना व्यतिरिक्त या मालिकेत अभिषेक बॅनर्जी, शिविन नारंग, दानिश इक्बाल, निशू दीक्षित, क्रिती विज आणि संजीव चोप्रा यांच्याही भूमिका आहेत.




# वेड्यासारखे का ओरडताय

शाहिद कपूरने अलीकडेच पत्नी मीरा राजपूत आणि कुटुंबासह रुहान कपूर आणि मनुकृती पाहवा यांच्या रिसेप्शन पार्टीला हजेरी लावली होती. अभिनेता मुंबईतील एका रेस्तरॉच्या बाहेर कुटुंबासह दिसला. जिथे तो पापाराझींवर भडकताना दिसला. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे. व्हिडीओमध्ये शाहिद पार्टीतून बाहेर आल्यानंतर त्याच्या कारची वाट पाहत होता. तेवढ्यात पापाराझींनी त्याला पाहिले आणि फोटोसाठी जोरजोरात आरडाओरड करण्यास सुरुवात केली. यावर शाहिद संतापला आणि म्हणाला- 'तुम्ही का ओरडत आहात, मी येथेच आहे? वेड्यासारखे का ओरडताय ? मी गाडीतून निघून गेल्यानंतर ओरडा. चिल करा'.

# 'चंद्रमुखी 2' चा ट्रेलर भलताच भयानक!

बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री कंगनाच्या ज्या चित्रपटाची चाहत्यांना कमालीची उत्सुकता होती त्या चंद्रमुखी २ या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. गेल्या काही दिवसांपासून चंद्रमुखी २ वरुन वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले होते. पहिल्यांदा तमिळ मग तेलुगू आणि नंतर हिंदी भाषेतील ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला आहे. २००५ मध्ये आलेल्या ब्लॉकबस्टर चंद्रमुखी या चित्रपटाचा सिक्वेल म्हणून चंद्रमुखी २ कडे पाहिले जात आहे. त्याचे दिग्दर्शन पी वासू यांनी केले होते. चंद्रमुखी २ मध्ये



कंगना राणावत मुख्य भूमिकेत असून तिच्यासोबत राघव लॉरेन्स दिसणार आहे.

बहुचर्चित अशा चंद्रमुखी २ चा ट्रेलर येताच त्यावर चाहत्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. हॉरर, सस्पेन्स या प्रकारातील चित्रपटांना प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळाला होता. कंगनानं चंद्रमुखी मध्ये एका नर्तिकेची भूमिका केली असून तो राघव लॉरेन्सनं राजा वेट्टीयान राजाची भूमिका साकारली.

# भारताने जिंकला हॉकी आशिया कप!

## » अंतिम फेरीत पाकिस्तानला टायब्रेकरमध्ये पराभूत केले

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारतीय हॉकी संघाने 5 खेळाडूंचा हॉकी आशिया कप जिंकला आहे. ओमानमध्ये खेळल्या गेलेल्या पहिल्या आशिया चषकाच्या अंतिम सामन्यात संघाने पाकिस्तानचा टायब्रेकरमध्ये 2-0 असा पराभव केला.निर्धारित वेळेत दोन्ही संघांनी 4-4 गोल केले. त्यानंतर सामन्याचा निर्णय टायब्रेकरने घेतला. टायब्रेकरमध्ये भारताचा विजय झाला. यासोबतच भारतीय संघ ओमानमध्ये जानेवारी-2024 मध्ये होणाऱ्या विश्वचषकासाठीही पात्र ठरला आहे.**




भारताकडून मोहम्मद राहिलने नियमानुसार दोन गोल केले, तर जुगराज सिंग आणि मनिंदर सिंग यांनी प्रत्येकी एक गोल केला. टायब्रेकरमध्ये गुरजोत सिंग आणि मनिंदर सिंग यांनी शूटआऊटमध्ये भारतासाठी गोल केले. पाकिस्तानकडून अब्दुल रहमान, कर्णधार अब्दुल राणा, झिकरिया हयात आणि अर्शद लियाकत यांनी निर्धारित वेळेत गोल केले. पूर्वार्धाच्या अखेरीस भारतीय संघ एका गोलने पिछाडीवर होता. पाकिस्तानने 3 गोल केले, तर भारताला केवळ 2 गोल करता आले. सामन्याच्या 45व्या मिनिटाला पाकिस्तानच्या अब्दुल रहमानने भारताचा गोलरक्षक सूरज कारकेराला चकित करत संघासाठी पहिला गोल करून संघाला 1-0 अशी आघाडी मिळवून दिली. 7व्या मिनिटाला जुगराज सिंगने गोल करून भारताची स्कोअर 1-1 अशी केली. 10व्या मिनिटाला मनिंदर सिंगच्या गोलमुळे भारताने 2-1 अशी आघाडी घेतली. पाकिस्तानचा कर्णधार अब्दुल राणाने 13व्या मिनिटाला गोल केला आणि अवघ्या मिनिटाला झिकरिया हयातने संघाला 3-2 अशी आघाडी मिळवून दिली. हाफ टाईमपर्यंत ही संख्या होती. उत्तरार्धात 19व्या मिनिटाला अर्शद लियाकतने गोल करून स्कोअर 4-2 असा केला. भारताला सामन्यात टिकण्यासाठी दोन गोलची गरज होती. लियाकतच्या गोलनंतर मोहम्मद राहिलने भारतासाठी गोल करत स्कोअर 4-3 असा केला. 26व्या मिनिटाला राहिलने पाकिस्तानच्या बचावफळीला चकवा देत गोल करत स्कोअर 4-4 असा बरोबरीत आणला. सामना संपेपर्यंत म्हणजेच निर्धारित वेळेच्या 30 मिनिटांपर्यंत स्कोअर 4-4 राहिला. यानंतर सामन्याचा निर्णय टायब्रेकरमध्ये झाला. टायब्रेकरमध्ये पाकिस्तानने दोन्ही संधी गमावल्या. तर भारतासाठी प्रथम गुरजोत सिंग आणि नंतर मनिंदर सिंग यांनी गोल करत भारतीय संघाला विजय मिळवून दिला. ही हॉकीची छोटी आवृत्ती आहे. जी 5-A साइड हॉकी म्हणून ओळखली जाते. फेडरेशन ऑफ इंटरनॅशनल हॉकी (FIH) ने गेल्या वर्षी त्याची सुरुवात केली. भारतीय संघाने जून महिन्यात पहिला 5-अ साईड हॉकी सामना खेळला होता. हॉकीच्या मर्यादित फॉरमॅटमध्ये काही गोष्टी बदलताना दिसतील. जसे की वेळ कालावधी, मैदानाचा आकार आणि खेळण्याचे नियम. सामान्य हॉकी सामन्याच्या तुलनेत, या सामन्याचा कालावधी अर्ध्यापेक्षा कमी म्हणजे सुमारे 30 मिनिटांचा असेल. त्याच वेळी तो 45X78 आकाराच्या टर्फमध्ये खेळला जाईल.

### 2 हाफ आणि 4 क्वार्टरमध्ये होणार

» हा सामना पूर्वीप्रमाणेच दोन हाफ आणि चार क्वार्टरमध्ये खेळवला जाईल. जर टर्फ विहित मानकापेक्षा लहान असेल तर 5 ऐवजी 4 खेळाडूंसह सामना खेळविला जाऊ शकतो. खेळात गोलरक्षक आवश्यक असतो. पण परिस्थितीनुसार गोलकीपरशिवाय मैदानी खेळाडूंसोबतच सामने खेळवले जाऊ शकतात. टर्फच्या आजूबाजूला साइड लाइन्सऐवजी साइड बोर्ड असतील. जेणेकरून चेंडू बाहेर जाणार नाही आणि बाजूचा बोर्ड नसेल तर सामान्य हॉकीचे नियम लागू होतील.

# भारताच्या दुसऱ्या सामन्यावरही पावसाचे सावट

## » आशिया चषकात आज भारताचा प्रथमच नेपाळशी सामना

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**आशिया कपमधील भारताचा दुसरा सामनाही पावसामुळे वाहून जाऊ शकतो. श्रीलंकेतील कँडी येथील पल्लेकेले स्टेडियमवर सोमवारी भारताचा नेपाळशी सामना होणार आहे. दुपारी सामन्याच्या वेळी ढगाळ वातावरण असेल. पावसाची 89 टक्के शक्यता आहे. तापमान 27 ते 21 अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहू शकते.**



त्याच स्टेडियममध्ये शनिवारी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामनाही पावसामुळे रद्द करण्यात आला होता. सामन्यादरम्यान पावसामुळे एकच डाव खेळता आला, तर दुसऱ्या डावातील एकही चेंडू टाकता आला नाही.

भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना 266 धावा केल्या. ACCUWEATHER नुसार, श्रीलंकेच्या हवामान खात्यानुसार, सोमवारी सकाळी 8 वाजल्यापासून कँडीमध्ये पाऊस पडण्याची शक्यता आहे आणि रात्री उशिरापर्यंत रिमझिम पाऊस सुरू राहू शकतो. सामन्याच्या वेळी, दुपारी 2 वाजल्यापासून मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. भारत आणि नेपाळ यांच्यातील सामना भारतीय वेळेनुसार दुपारी 3 वाजता होणार आहे. नाणेफेक दुपारी 2.30 वाजता होईल. भारत आणि नेपाळ यांच्यातील सोमवारी होणारा सामना पावसामुळे रद्द झाला तरीही भारत सुपर फोरमध्ये पोहोचेल. वास्तविक नेपाळचा पहिला सामना पाकिस्तानविरुद्ध हरला आहे. अशा स्थितीत नेपाळ सध्या आपल्या गटात तळाच्या स्थानावर असून त्यांचे शून्य गुण आहेत, तर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना रद्द झाल्यामुळे दोन्ही संघांचे 1-1 गुण झाले आहेत. आशिया चषक स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान यांच्यात शनिवारी खेळला जाणारा एकदिवसीय सामना पावसामुळे रद्द करण्यात आला. सध्या गुणतालिकेत पाकिस्तान आपल्या गटात 3 गुणांसह अव्वल स्थानावर आहे. तर भारत दुसऱ्या स्थानावर आहे. अशा परिस्थितीत नेपाळसोबतचा सामना रद्द झाल्यास त्याचे 2 गुण होतील आणि नेपाळकडे फक्त 1 गुण असेल. अशाप्रकारे गटात दुसरे स्थान मिळवून भारत पाकिस्तानसह सुपर फोरमध्ये पोहोचेल.

### भारताचा प्रत्येक 24 वा वनडे रद्द

» आशिया चषक स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान यांच्यात शनिवारी खेळला जाणारा एकदिवसीय सामना पावसामुळे रद्द करण्यात आला. एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात 44व्यांदा भारताचा सामना रद्द करण्यात आला आहे. टीम इंडियाच्या नावावर याआधीच विश्वविक्रम आहे. भारताचा प्रत्येक 24 वा वनडे रद्द होतो. सामने रद्द होण्यामागे पाऊस हा सर्वात मोठा घटक आहे.